# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


## विशेष वार्तापत्र

जा.क्र ४५३/जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०८/२०१८

# फिरत्या पोलीस स्टेशनला जनतेचा प्रतिसाद वाढला शेतीच्या हंगामातही फिरत्या पोलीस स्टेशनला जनतेची उपस्थिती

**भंडारा:–** जिल्हयात मा. पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात दिनांक १८/०८/२०१८ रोजी जिल्हयात ठिकठिकाणी फिरते पोलीस स्टेशन कॅम्प लावण्यात आले होते. यामध्ये पोलीस स्टेशन लाखनी अंतर्गत बो गांव येथे फिरते पोलीस स्टेशन चे आयोजन करण्यात आले त्यामध्ये पोनि. मंडलवार सोबत ५ कर्म यांनी जनतेस मार्गदर्शन केले यावेळी अर्जदार नितीन श्रावण सेंदुरकर वय ३० वर्ष रा. बोरगाव यांनी गैरअर्जदार विरूध्द घरघुती वाद गैरअर्जदार हा अर्जदाराच्या आईला व बहीणीला दारु पिण्याकरीता पैसे मागुन शिवीगाळ करीत होता. यावरुन तक्रार केली होती. तंटामुक्ती समितीच्या माध्यमातुन सदर तक्रार तेथेच सोडविण्यात आली यावर लगेच तातडीने तक्रार निवारण झाल्याने अर्जदार व गैरअर्जदार यांनी समाधान व्यक्त केले. पोलीस स्टेशन पवनी अंतर्गत शिवानाळा येथे फिरते पोलीस स्टेशन उभारण्यात आले. त्यामध्ये उपविभागीय अधीकारी पवनी श्री. प्रभाकर तिक्कस, पोलीस स्टेशनचे ठाणेदार पोलीस निरीक्षक चकाटे तसेच ५ कर्म. यांनी अल्पवयीन मुले –मुली पळुन जातात. त्याचेकडे त्यांच्या पाल्यानी जास्तीत जास्त लक्ष देणे, मोबाईल एटीएम, फसवणुक बाबत माहीती दिली. त्यावेळी १०० स्त्री, १२५ पुरूष उपस्थित होते. पोलीस स्टेशन दिघोरी अंतर्गत येडगाव येथे फिरते पोलीस स्टेशनचे कॅम्प लावण्यात आले. सहायक पोलीस निरीक्षक गांवडे व ४ कर्म यांनी रात्र घरफोडी, चोरी यांसारखे गुन्हे घडू नये. यासाठी ग्राम सुरक्षा दल सक्रीय करणे गावात गस्त घालावी, एटीएम बॅक, याबाबत मार्गदर्शन करणे, गावात अवैद्य धंदे चालणार नाहीत याबाबत मार्गदर्शन विषयक कायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यावेळी ३५ ते ४० स्त्री पुरुष उपस्थित होते. पोलीस स्टेशन आंधळगांव अंतर्गत काठी येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. पोलीस स्टेशनचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक सोनटक्के व पोलीस उपनिरीक्षक म्हसकर ४ कर्म यांनी महिला विषयक कायदे बाबत मार्गदर्शन केले. चोरी, घरफोडी, अफवावर विश्वास ठेवु नये तसेच सायबर क्राईम बाबत माहीती दिली. पोलीस स्टेशन लाखांदुर अंतर्गत इंदोरा येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. पोलीस स्टेशनचे ठाणेदार पोलीस निरीक्षक मेश्राम व २ कर्म यांनी सायबर क्राईम, ऑनलाईन फ्रॉड गावातील तंटे गावातचे मिटवीणे. ग्राम सुरक्षा दल सक्रीय करणे तसेच महिला विषयक कायदया विषयी मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस स्टेशन मोहाडी अंतर्गत ग्राम पारडी येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक थेरे २ कर्म यांनी अनोळखी इसक गावात आढळुन आल्यास त्याला मारहान न करता पोस्टेला माहीती दयावी. अंधश्रध्दा, पसरविणे, हा कायदयाने गुन्हा आहे. व्हॉट्सअॅपवर येणारे संगळेच मॅसेज खरे नसतात

ऑनलाईन फ्रॉड केसेसच्या संतर्कतेच्या सुचना देण्यात आल्या. पोलीस स्टेशन वरठी अंतर्गत जमनी यामध्ये पोलीस उपनिरीक्षक राऊत ३ कर्म यांनी मोबाईल फ्रॉड गुन्हे ऑनलाईन बॅकींग, महिला अत्याचार बाबत कायदे विषयक याविषयावर मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस स्टेशन गोबरवाही अंतर्गत मंगरली येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले सपोनि. म्हसकर २ कर्म यांनी अंधश्रध्दा निर्मुलना बाबत, सायबर क्राईम, स्त्रिया व बाल लैगिक अपराधाबाबत माहीती दिली. पावसाळयात आरोग्याची काळजी कशी घ्यावी. याबाबत माहीती दिली. पोलीस स्टेशन कारधा अंतर्गत कारधा येथे फिरते पोलीस स्टेशन कॅम्प लावण्यात आला होता त्यामध्ये ४ कर्म यांनी छोटे, तंटे, गावातच सोडवणे, प्रतिसाद ॲप्स, चोरी, व घरफोडी, होवु नये व बॅकींग फसवणुक बाबत माहीत दिली. वाहन ध्वनी प्रदुषण तसेच गाव दारुबंदी करणे बाबत माहीती दिली. पोलीस स्टेशन करडी अंतर्गत ग्राम देव्हाडा खुर्द येथे फिरते पोलीस स्टेशन कॅम्प लावण्यात आले. शेतीविषयक तंटे गावातच मिटविणे., पोलीस मित्र, ध्वनी प्रदुषण, अंधश्रध्दा कार्यक्रम महिला अत्याचार बद्दल मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस स्टेशन भंडारा अंतर्गत ग्राम मारेगाव येथे फिरते पोलीस स्टेशन कॅम्प लावण्यात आले. महिलावर होणारे अत्याचार, बाल लैगिंक अत्याचार, एटीएम व मोबाईल फसवणुक बाबत माहीती दिली. पोलीस स्टेशन जवाहरनगर अंतर्गत ग्राम खरबी यथे फिरते पोलीस स्टेशनचे कॅम्प लावण्यात आले. शेतीविषयी तंटे रहदारीचे नियम, महिला अत्याचार विशयी मार्गदर्शन करण्यात आले.

एकुणच पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांच्या संकल्पनेतुन राबविण्यात येत असलेल्या फिरत्या पोलीस स्टेशन उपक्रमाचे फायदे जनतेच्या लक्षात येत असल्याने रोहणीचा व शेतातील ईतर महत्वाचे कामांचा हंगाम सुरू असुनही लोक मोठया प्रमाणावर फिरत्या पोलीस स्टेशनला हजर राहुन जनतेकडून मोठया प्रमाणावर हजर राहून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसुन येत आहे. लोक त्याचे तक्रारींचे निवारण करून घेत आहेत. तसेच पोलीसांकडुन मिळणा—या वेगवेगळया सुचनांची माहीती घेत आहेत. त्यामुळे पोलीस व जनता यांच्यामध्ये विश्वासाचे नाते निर्माण होत असुन जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधीत असल्याचे चित्र दिसत आहे. अधिकाधिक लोकांनी फिरते पोलीस स्टेशन उपक्रमात सहभागी होवुन आपल्या समस्या व तक्रारी सोडवणुन घ्याव्यात विनाकारण न्यायालयापर्यंत नेवु नये आपल्या वेळेची व पैशाची बचत करावी व गावामध्ये शांततेचे व विकासाचे वातावरण निर्माण करावे असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांनी जिल्हा वासीयांना केले.

**(जितेद्रं के आडोळे)**
**पोलीस उपनिरीक्षक**
**जनसंपर्क अधिकारी**
**दुरध्वनी.क्र. ९४०३१०९७२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.